शासन–विरुध्द–प्रणय

निशाणी क्र. ३२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी –**

**मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव –कन्हैय्या प्रेमसिंग राजपुत

वय –३० वर्षे, कामधंदा –कापड विक्रेता,

राहणार–हनुमान नगर, फुकट नगर, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे स.शा.अ. श्री. एस.आर.ठावरी यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

०१. मी दोन्ही आरोपींना ओळखतो. ते माझे मित्र आहेत. घटना ही मागच्या वर्षी हनुमान मंदीराजवळ, बंगाली कॅम्प, भद्रावती येथे सकाळी १० वाजता घडली होती. त्यावेळी आरोपी कुठे होते, हे मला माहित नाही. मी घटनेची फिर्याद दिली होती. मला दाखविण्यात आलेल्या तोंडी रिपोर्ट आणि छापील प्रथम खबर अहवालावर माझी सही आहे, मजकुर मला माहित नाही. सही अनुक्रमे **नि.क्र.३३ व ३४** देण्यात येते.

**साक्षीदार त्याचे पूर्वीचे बयाणापासून परावृत्त झाल्यामुळे साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी विशेष सरकारी वकील यांनी मागितली, परवानगी देण्यांत आली...**

हे खरे नाही की, दि.१४/०४/२०१८ रोजी सायंकाळी ७ वाजताचे दरम्यान मी भाजीपाला घेण्याकरीता मोटार सायकलने प्रशांत ठाकरे सोबत आलो होतो व ८ वाजताचे दरम्यान घराकडे परत गेलो. हे खरे नाही की, कृष्णा सरकारचे घरासमोरील रस्त्यावरील चौकात मी गाडी बाजुला उभी करुन थांबलो होतो, त्यावेळी दोघेही आरोपी दारु पिवुन आले व विक्की बांगर याचे ट्रॅक्टरवर काउन जाता, या कारणावरुन माझ्याशी भांडण करुन शिवीगाळ केली. हे खरे नाही की, त्यावेळी नागेश केळझरकर याने त्याचे हातातील लोखंडी वस्तुने माझे उजव्या डोळयाच्या खाली व कपाळावर मारुन जखमी केले होते व महेश याने माझे सोबत असलेल्या मित्राला लाथाबुक्क्यांनी माराहन केली होती व मारण्याची धमकी दिली होती. माझे बयाण व फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग–अ यातील मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता,त्यांनी तो का लिहीला, याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांनी मला तपासणीकरीता पाठविले नव्हते. मला दाखविण्यात आलेल्या एम.एल.सी.वर माझी सही आहे. सहीस **नि.क्र.३५** देण्यात येते. माझा आरोपींसोबत आपसी समझौता झाला आहे व मला सदरचे प्रकरण चालविण्यात स्वारस्य नाही. हे खरे नाही की, वरील

नमुद कारणामुळे मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलट तपास विधीज्ञ श्रीमती खडके यांच्या मार्फत–नाकारला.**

**फेर तपास–नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत, समक्ष,

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.05.06 13:46:55 +0530

दिनांकः– ०५/०५/२०२६ **(ए.एस. जरुदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती